पुढारी

# 'विकासाचे यशवंतयुग' पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व देशाचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीच्या निमित्ताने मंगळवारी विद्यापीठातर्फे 'विकासाचे यशवंतयुग' पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. तत्पूर्वी, विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटमधील सहायक प्रा. तानाजी घागरे यांनी हे पुस्तक लिहिले आहे. महाराष्ट्र व देशाच्या सर्वांगीण विकासासाठी यशवंतराव चव्हाण यांनी केलेले कार्य, राबविलेली धोरणे व घेतलेले निर्णय आदी अनेक पैलू पुस्तकातून उलगडले आहेत.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'विकासाचे यशवंतयुग' पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, प्रा. डॉ. ए. एम. गुरव, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश पवार, प्रा. तानाजी घागरे. (छाया : पप्पू अत्तार)**

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नितीन माळी, डॉ. अमोल मिणचेकर उपस्थित होते.

लोकमत

# 'विकासाचे यशवंतयुग'चे विद्यापीठात प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्ताने मंगळवारी शिवाजी विद्यापीठातर्फे 'विकासाचे यशवंतयुग' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटमधील साहाय्यक प्राध्यापक तानाजी नामदेव घागरे यांनी हे पुस्तक लिहिले आहे.

महाराष्ट्र आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी यशवंतरावांनी केलेले कार्य, राबविलेली धोरणे व घेतलेले कठोर निर्णय, आदी अनेक पैलू 'विकासाचे यशवंतयुग' या पुस्तकातून उलगडले आहेत. यशवंतराव चव्हाण यांच्या कारकिर्दीत शिक्षण, कृषी, सहकार, कृषी-औद्योगिकीकरण, सामाजिक सुधारणा व सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून केलेले विकासकार्य, आदींचा सविस्तर आढावा घागरे यांनी या पुस्तकात घेतला आहे. दरम्यान, विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, नितीन माळी, अमोल मिणचेकर, आदी उपस्थित होते.




**शिवाजी विद्यापीठातर्फे यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त तानाजी घागरे यांनी लिहिलेल्या 'विकासाचे यशवंतयुग' या पुस्तकाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते मंगळवारी प्रकाशन झाले. डावीकडून व्ही. एन. शिंदे, ए. एम. गुरव, विलास नांदवडेकर, प्रकाश पवार, व्ही. टी. पाटील, आदी उपस्थित होते.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 MAR 2019
तरुण भारत

# 'विकासाचे यशवंतयुग' मधून इतिहास उलगडला

## यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त तानाजी घागरे यांनी लिहिलेल्या विकासाचे यशवंतयुग" या पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. ए. एम. गुरव, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. प्रकाश पवार, तानाजी घागरे, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्राच्या तसेच देशाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या कारकिर्दीत शिक्षण, कृषी, सहकार, कृषी-औद्योगिकीकरण, सामाजिक सुधारणा व सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून केलेले विकासकार्य आदी पैलू 'विकासाचे यशवंतयुग" या पुस्तकातून लेखक प्रा. तानाजी घागरे यांनी उलगडले आहेत.

महाराष्ट्राचे शिल्पकार व देशाचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील 'विकासाचे यशवंतयुग" या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटमधील सहाय्यक प्रा. तानाजी नामदेव घागरे यांनी हे पुस्तक लिहीले आहे.

दरम्यान , विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी व्ही.टी. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. ए.एम. गुरव, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नितीन माळी, डॉ. अमोल मिणचेकर यांच्यासह यशवंतराव चव्हाण स्कूलचे अन्य शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# 'राष्ट्रीय एकात्मतेसाठी एकमेव भाषा हिंदी'

कोल्हापूर : भारतासारख्या बहुधर्मी, बहुभाषी, बहुप्रांतीय देशामध्ये राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी हिंदी हीच एकमेव भाषा उपयोगी आहे, असे प्रतिपादन हिंदीचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण यांनी रविवारी (दि. १०) येथे केले. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे संचलित कोल्हापुरातील हिंदी प्रचार केंद्राच्या वतीने आयोजित हिंदी प्रचारकांच्या संमेलनात ते बोलत होते. यावेळी दीपक यादव, सत्यवान कोत्रे, विमल शिगाडे, आशिषकुमार यमगर, राजीव कांबळे, सागर मानुगडे यांनी मनोगत व्यक्त केले. हिंदी प्रचार केंद्राचे अध्यक्ष डॉ. एन. व्ही. केसरकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

लोकमत

# 'फोटोग्राफी ऑन व्हील्स' कोल्हापूर दोऱ्यावर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'फोटोग्राफी ऑन व्हील्स' या उपक्रमांतर्गत प्रख्यात छायाचित्रकार पद्मश्री सुधारक ओलवे हे आज, बुधवारपासून चार दिवस कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. याअंतर्गत कार्यशाळा, छायाचित्र प्रदर्शन व गप्पा अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आज, बुधवारी सकाळी ११ ते एक या वेळेत शिवाजी विद्यापीठाच्या सेमिनार हॉलमध्ये त्यांचे छायाचित्र प्रदर्शन व मार्गदर्शन होणार आहे.

गुरुवारी (दि. १४) सकाळी सहा ते आठ या वेळेत रंकाळा तलावाच्या परिसरात छायाचित्र प्रदर्शन, अकरा वाजता विवेकानंद महाविद्यालयात मार्गदर्शन होईल. शुक्रवारी (दि. १५) सायंकाळी पाच वाजता ते गुरुशिष्य पुरस्कार वितरण समारंभासाठी उपस्थित असतील. शनिवारी (दि. १६) कोल्हापूर प्रेस क्लब येथे सकाळी नऊ ते एक या वेळेत छायाचित्र कार्यशाळा होणार आहे.

'फोटोग्राफी ऑन व्हील्स' हा फोटोबुक लायब्ररीसह छायाचित्र, कलाकार व छायाचित्रकार अशा सहकाऱ्यांसमवेत व्हॅनद्वारे राज्यभर डॉक्युमेंटेशन दौरा सुरु आहे.

गावोगावी, छोट्या-मोठ्या शहरांतून प्रवास करताना जनमानसांतील कथांपर्यंत पोहोचून त्यांचे डॉक्युमेंटेशन करीत, वाटेत भेटणाऱ्यांशी संवाद साधत, त्यांच्यात आणि छायाचित्रणात नवा दुवा साधत, या कार्यशाळेचा प्रवास सुरु आहे. यात पद्मश्री सुधारक ओलवे यांच्यासह इंद्रजित खांबे, सुरेंद्र राव, नीलेश गावडे, अभिजित गुर्जर, रवींद्र अष्टेकर हे सहभागी होणार आहेत.

लोकमत

# विदेशी भाषा विभागातर्फे माहितीपट प्रदर्शन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग आणि मराठी विभागातर्फे शुक्रवारी (दि. १५) दुपारी साडेबारा वाजता माहितीपट प्रदर्शन आयोजित केला आहे. विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये 'धुक्यात हरवलेले लाल तारे' हा माहितीपट दाखविण्यात येणार आहे. सोविएत रशियन बालसाहित्याच्या मराठी अनुवादांचा मागोवा घेणारा हा माहितीपट आहे. त्याच्या प्रदर्शनानंतर निर्माते देवदत्त राज्याध्यक्ष, निखिल राणे आणि प्रसाद देशपांडे यांच्याशी मुक्तसंवाद आयोजित केला आहे, अशी माहिती विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी दिली. या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

Hello Kolhapur
Page No. 7 Mar 13, 2019
Powered by: erelego.com